




# दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com



**1,22,570**

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०३ ● अंक : ०२४ ● पुणे ● सोमवार, दि. ०६ ऑक्टोबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




दीक्षारंभ – कथक नृत्याचा सुरेल आरंभ 3



बड्या नेत्याच्या मदतीने कुख्यात गुंड घायवळ पळाला परदेशात 4

# भारताच्या लेकींचा दणदणीत विजय

## सामन्यानंतर थेट ड्रेसिंग रूममध्ये पोहोचली टीम इंडिया; पाकिस्तानकडे दुर्लक्ष

**नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजीला उतरल्यानंतर, भारतीय संघाची सुरुवात खराब झाली. स्मृती मानधना तिच्या चांगल्या सुरुवातीचा फायदा घेऊ शकली नाही आणि २३ धावांवर बाद झाली. स्मृती लवकर बाद झाल्याने भारताच्या धावांची गती कमी झाली. त्यानंतर प्रतिका रावल ३१ धावा करत बाद झाली. हरलीन देओलने काही शानदार फटके खेळले पण ती ४६ धावांवर बाद झाल्याने तिचं अर्धशतक हुकलं. दीप्ती शर्मानेही चांगली सुरुवात केली, पण ती २५ धावांवर बाद झाली. स्नेह राणाने देखील चांगले फटके खेळले. शेवटच्या षटकांमध्ये रिचा घोषने २० चेंडूत ३५ धावांची दमदार खेळी करत भारताला २४७ धावांपर्यंत पोहोचवलं.**

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतीय महिला संघाने पाकिस्तानला आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक सामन्यात दणदणीत विजय मिळवला आहे. टीम इंडियाने वर्ल्डकपमध्ये सलग दुसरा विजय नोंदवला. पाकिस्तान संघाला १५९ धावांवर सर्वबाद केलं आणि शानदार विजय मिळवला. श्रीलंकेला पराभूत केल्यानंतर, भारताने आता पाकिस्तानला पराभूत करून आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. या विजयासह, भारताने सलग



१२ व्यांदा पाकिस्तानला पराभूत करून आपला विक्रम कायम ठेवला आहे. यासह, विश्वचषकात पाकिस्तान महिला संघावर सलग पाचवा विजय मिळवला आहे. भारतीय संघाने पाकिस्तानवर विजय मिळवल्यानंतर हरमनसह संपूर्ण संघ थेट ड्रेसिंग रूमच्या दिशेने निघाला. यासह आशिया चषकातील सामन्यांप्रमाणे महिला विश्वचषकातही भारताच्या महिला संघाने पाकिस्तानी संघातील खेळाडूंशी हस्तांदोलन केलं नाही. तर नाणेफेकीदरम्यानही हरमनप्रीत कौरने फातिमा सनाशी हस्तांदोलन केलं नाही, ना नजरानजर झाली.

नाणेफेक गमावल्यानंतर, टीम इंडियाने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि ५० षटकांत २४७ धावांवर गारद झाला. टीम इंडियाकडून हरलीन देओलने सर्वाधिक ४६ धावा केल्या. २४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानी महिला संघ ४३ षटकांत १५९ धावांवर सर्वबाद झाला आणि टीम इंडियाने पाकिस्तानवर शानदार विजय मिळवला. टीम इंडियाकडून क्रांती गौड आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी तीन विकेट घेतल्या. सामन्यादरम्यान मैदानावर प्रचंड प्रमाणात कीटक आल्याने अक्षरश: सामना काही वेळ थांबवण्यात आला होता, जेणेकरून मैदानावर स्प्रे करता येईल. भारताने दिलेल्या २४८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवात खूपच खराब झाली आणि २६ धावांत त्यांनी तीन विकेट गमावल्या. यानंतर, सिद्रा अमीनने एका टोकाला पाय घट्ट रोवून ठेवत संघाचा डाव सांभाळण्याचा प्रयत्न केला पण दुसऱ्या टोकाकडून नियमित अंतराने विकेट पडत राहिल्या. या सामन्यात सिद्रा अमीनने १०६ चेंडूत ८१ धावा केल्या. दरम्यान, आठ पाकिस्तानी खेळाडूंना डावात दुहेरी आकडा गाठता आला नाही.

टीम इंडियाकडून क्रांती गौड आणि दीप्ती शर्मा या सर्वात यशस्वी फलंदाज ठरल्या. क्रांतीने तिच्या १० षटकांमध्ये फक्त २० धावा देत तीन विकेट घेतल्या. तर दीप्तीने ९ षटकांत ४५ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. तर स्नेह राणाने १ विकेट घेतली.

## ठळक बातम्या

### बंगल्यात चंदन चोरी

**पुणे (आरंभ पर्व) : सहकारनगर भागातील बंगल्याच्या आवारातून चंदनाचे झाड चोरट्यांनी कापून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी एका ज्येष्ठ नागरिकाने सहकारनगर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार चंदन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे पद्मावती मंदिरामागे असलेल्या चैतन्य मंदार सोसायटीत राहायला आहेत. ३ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री चोरटे बंगल्यात शिरले. चोरट्यांनी बंगल्याच्या आवारातील चंदनाचे झाड कापून नेल्याचा प्रकार उघडकीस आला. पोलीस कर्मचारी नीलेश शिवतारे तपास करत आहेत. शहर परिसरात गेल्या काही महिन्यांपासून चंदन चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. शैक्षणिक संस्थांचे आवार, शासकीय कार्यालये, तसेच सोसायटीच्या आवरातून चोरट्यांनी चंदनाची झाडे कापून नेली आहेत. सोसायटीच्या आवारात लावलेली पाच लाख रुपयांची मोटार चोरट्यांनी लांबविल्याची घटना घोरपडीतील बी. टी. कवडे रस्त्यावर घडली. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध मुंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एकाने मुंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार हे बी. टी. कवडे रस्त्यावरील ब्रह्माबाग सोसायटीत राहायला आहेत. शनिवारी (४ ऑक्टोबर) पहाटे चोरट्यांनी सदनिकेचे कुलूप तोडले. शयनगृहातील कपाटात ठेवलेली मोटारीची किल्ली काढून घेतली.**

## आंदेकर टोळीच्या समर्थनार्थ 'स्टेटस' ठेवणाऱ्या आरोपींची धिंड

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आंदेकर टोळीच्या समर्थनार्थ समाजमाध्यमात धमकीचे 'स्टेटस' ठेवणाऱ्या पाच जणांना समर्थ पोलिसांनी अटक केली. या प्रकरणी पाज जणांविरुद्ध समर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मंथन सचिन भालेराव, फैजान शेख, पीयूष बिडकर, अथर्व नलावडे, ओंकार मेरगू अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी धमकी देणारे 'स्टेटस' समाजमाध्यमातील खात्यावर ठेवले होते. सराइतांकडून समाजमाध्यमात प्रसारित केल्या जाणाऱ्या संदेशांवर पोलिसांनी नजर ठेवली होती. आंदेकर टोळीतील सराइत भालेराव, बिडकर, नलावडे, मेरगु यांनी धमकीचे 'स्टेटस' ठेवल्याची माहिती तांत्रिक विश्लेषणात मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्यांना ताब्यात घेतले. आंदेकर टोळीच्या समर्थनार्थ धमकीचे 'स्टेटस' ठेवून दहशत माजविल्याप्रकरणी पाच जणांना अटक करण्यात आली. समर्थ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

नाना पेठेतील टोळीयुद्ध, तसेच माजी नगरसेवक वनराज आंदेकर याच्या खुनाचा बदला घेण्यासाठी गणेश कोमकर याचा मुलगा आयुष कोमकर याच्यावर पिस्तुलातून गोळीबार करून खून करण्यात आल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी घडली होती. आयुष हा बंडू आंदेकरचा नातू आहे. वनराज आंदेकर खून प्रकरणात गणेश कोमकरला अटक करण्यात आली होती. त्यानंतर बंडू आंदेकरने आयुषच्या खुनाचा कट रचला होता. अमन पठाण आणि यश पाटील यांनी त्याच्यावर गोळीबार केला होता.

## तुळशीबागेत महिलेचे ९० हजारांचे दागिने लंपास; घटनांमध्ये वाढ

**पुणे (दै. आरंभ पर्व) :**

तुळशीबागेत खरेदीसाठी आलेल्या महिलेच्या पिशवीतून ९० हजारांचे दागिने चोरट्यांनी लांबविल्याची घटना घडली. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत एका महिलेने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला सिंहगड रस्ता भागातील नऱ्हे परिसरात राहायला आहेत. त्या शनिवारी (४ ऑक्टोबर) दुपारी चारच्या सुमारास तुळशीबागेत खरेदीसाठी आल्या होत्या. हुतात्मा बाबू गेणू चौकातून त्या तुळशीबागेकडे जात असताना चोरट्याने गर्दीत त्यांच्या पिशवीची चेन उघडून ९० हजारांचे दागिने लांबविले. दागिने चोरीला गेल्याचे उघडकीस आल्यानंतर



महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस हवालदार सुरवसे तपास करत आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून तुळशीबागेत खरेदीसाठी आलेल्या महिलांच्या पिशवीतून दागिने लांबविण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. दिवाळी, गणेशोत्सवात तुळशीबागेत खरेदीसाठी गर्दी होती. गर्दीत महिलांकडील दागिने लांबविण्याच्या पाच घटना गेल्या काही महिन्यात घडल्या आहेत. या प्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरट्यांना पकडण्यात पोलिसांना अपयश आले आहे. तुळशीबागेत महिलांकडील दागिने लांबविण्याचे सत्र कायम आहे. तुळशीबागेतील चोरी, गैरप्रकार रोखण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. तुळशीबागेत महिलांकडील दागिने लांबविण्याच्या घटना वाढल्याने या भागात साध्या वेशातील पोलिसांची गस्त वाढवावी, तसेच दिवाळीत होणारी गर्दी विचारात घेऊन या भागात बंदोबस्तासाठी पोलीस ठेवण्यात यावेत, अशी मागणी तुळशीबागेतील व्यापाऱ्यांनी केली आहे.

### ज्येष्ठाकडील दोन लाखांची सोनसाखळी चोरी

**पीएमपी प्रवासी ज्येष्ठाकडील दोन लाख रुपयांची सोनसाखळी चोरट्यांनी लांबविल्याची घटना स्वारगेट स्थानकात घडली. याबाबत एका ७० वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार ज्येष्ठ नागरिक हे कात्रज भागातील आंबेगाव परिसरात राहायाल आहेत. ते शनिवारी (४ ऑक्टोबर) रात्री नऊच्या सुमारास स्वारगेट स्थानकातून आंबेगावकडे निघाले होते. पीएमपी बसमध्ये प्रवेश करताना चोरट्यंनी त्यांच्या गळ्यातील एक लाख ९५ हजारांची सोनसाखळी लांबविली. पोलीस उपनिरीक्षक कोतकर तपास करत आहेत. पीएमपी प्रवासी महिलांकडील दागिने, मोबाइल संच लांबविण्यच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. शहरातील गर्दीच्या पीएमपी स्थानकांवर चोरट्यांचा सुळसुळाट झाला आहे. पीएमपी प्रवाशांकडील दागिने लांबविण्याच्या दिवसाआड एक ते दोन घटना घडतात. पीएमपी प्रवाशांकडील लाखो रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लांबविला आहे.**

## पोलिसच असुरक्षित; पोलीस कर्मचाऱ्यावर कोयत्याने वार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरात रस्त्यावर होणाऱ्या वादावादीतून मारहाणीच्या घटना वाढलेल्या असताना मध्यरात्री विधी महाविद्यालय रस्त्यावर गुन्हे शाखेतील एका पोलीस कर्मचाऱ्यावर कोयत्याने वार करण्यात आल्याची घटना घडली. या प्रकरणी डेक्कन जिमखाना पोलिसांनी दुचाकीस्वारासह साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला. अमोल काटकर असे गंभीर जखमी झालेल्या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. काटकर हे गुन्हे शाखेच्या युनिट तीनमध्ये नियुक्तीस आहेत. मध्यरात्री एकच्या सुमारास ते कामावरून घरी निघाले होते. विधी महाविद्यालय रस्त्याने दुचाकीस्वार काटकर निघाले होते. त्यावेळी दुचाकीवरुन



दोघे जण निघाले होते. दुचाकीला हूल दिल्याने दुचाकीस्वार आरोपींना पोलीस कर्मचारी काटकर यांनी विचारणा केली. त्यावेळी झालेल्या वादातून दुचाकीवरील आरोपींनी काटकर यांच्या डोक्यावर कोयत्याने वार केला. या घटनेत काटकर जखमी झाले. त्यांनी त्वरीत या घटनेची माहिती नियंत्रण कक्षाला दिली. या घटनेनंतर डेक्कन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या काटकर यांना तातडीने डेक्कन जिमखाना भागातील एका खासगी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले. पसार झालेला दुचाकीस्वार आणि त्याच्या साथीदाराचा शोध घेण्यात येत आहे. शहरात रस्त्यावर होणाऱ्या वादातून थेट हल्ले करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. महिनाभरापूर्वी सेनापती बापट रस्त्यावर मोटारीस पुढे जाण्यास जागा न दिल्याने मोटार चालक तरुणावर कोयत्याने वार करण्यात आल्याची घटना घडली होती .भारती विद्यापीठ भागातील फालेनगर परिसरात एका दुचाकीस्वार तरुणावर कोयत्याने वार करुन टोळक्याने परिसरात दहशत माजविल्याची घटना घडली होती.

# पुण्यात भाजपचे 'प्रवेश'द्वार काही काळासाठी बंद?

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आगामी महापालिका निवडणुकीत 'शत प्रतिशत भाजप'साठी अन्य पक्षांतील माजी नगरसेवक आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांसाठी दारे उघडी करणाऱ्या भाजपला आता पक्षांतर्गत विरोधामुळे काही काळासाठी 'प्रवेश'द्वार बंद करण्याची वेळ आली आहे.

वडगाव शेरी विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार बापू पठारे यांचे चिरंजीव सुरेंद्र पठारे यांच्या भाजपमध्ये प्रवेशाच्या चर्चेनंतर भाजपमध्ये अंतर्गत वाद उफाळून आला आहे. पक्षाची शिस्त आणि महापालिकेच्या निवडणुकीत उमेदवारी नाकारली जाण्याच्या भीतीपोटी आतापर्यंत कोणीच उघडपणे विरोधाची भूमिका घेतली नव्हती. मात्र, आता काही पदाधिकाऱ्यांनी पक्षाच्या स्थानिक पातळीवरील नेत्यांना पत्र देऊन विरोध दर्शविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे महापालिका निवडणुका



जवळ आल्या असताना पक्षातील अंतर्गत बंडाळी टाळण्यासाठी काही काळासाठी भाजपने 'प्रवेश'द्वार बंद केल्याचे भाजपच्या गोटातून सांगण्यात आले.

महापालिकेवर एकहाती सत्ता मिळविण्यासाठी पुण्यात भाजपने तयारी सुरू केली आहे. भाजपसाठी अडचणीच्या असलेल्या प्रभागांमधील अन्य पक्षांतील लोकसंपर्क असलेले माजी नगरसेवक आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांना भाजपमध्ये प्रवेश देण्यास सुरुवात केली आहे. काहींना प्रवेश देताना महापालिका निवडणुकांमध्ये उमेदवारी किंवा अन्य पद देण्यासाठी 'शब्द'ही पक्षातील स्थानिक नेत्यांकडून देण्यात येत आहे. आगामी काळात त्यांचे पक्षप्रवेश निश्चित करण्यात आले आहेत.

मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार बापू पठारे यांचे चिरंजीव सुरेंद्र यांच्या प्रवेशाच्या चर्चेनंतर भाजपमध्ये अंतर्गत वाद उफाळून आला आहे. सुरेंद्र हे भाजपमध्ये प्रवेश करणार नसून, ही अफवा असल्याचे बापू पठारे यांनी स्पष्ट केले आहे. मात्र, त्यांच्या प्रवेशावरून भाजपमधील अंतर्गत खदखद बाहेर आली आहे.

भाजपने यापूर्वी अन्य पक्षांतील माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांना प्रवेश दिला आहे. त्यावरूनही भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजी आहे. मात्र, उघडपणे विरोध करून पक्षाच्या शिस्तीला बाधा आणायची नाही, ही शिकवण मूळ भाजपच्या पदाधिकाना देण्यात आली असल्याने आतापर्यंत कोणीही जाहीरपणे विरोधाची भूमिका घेतलेली नव्हती, मात्र, पठारे यांच्या प्रवेशाच्या चर्चेनंतर भाजपमधील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला आहे.




जाहिरात म्हणलं की

दैनिक आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

आपल्या सर्व कायदेशीर आणि अधिकृत जाहिरातींसाठी विश्वासार्ह व्यासपीठ

आम्ही प्रकाशित करतो :

- वकील नोटीस
- कोर्ट नोटीस
- जाहिर नोटीस
- वाहन हस्तांतरण नोटीस
- बँकांचा ताळेबंद
- सर्वांना आवाहन करणाऱ्या जाहिराती
- ग्रामपंचायत जाहिराती

दै. आरंभ पर्व हे आपल्या जाहिराती योग्य वेळी व नियमांनुसार प्रसिद्ध करून देण्यासाठी वचनबद्ध आहे.

- विश्वासार्हता
- वेळेवर प्रकाशन
- कायदेशीर आवश्यकता पूर्ण

संपर्क : प्रतिक गंगणे ७२७६३१४१४२ / ८६५७८६५७०२



# उडदामाजी काळे-गोरे



चमकोगिरी करणारे संधिसाधू नेते आणि त्यांच्या कार्यकर्त्यांचे पीक शहरात अवतरले आहे. स्वप्रतिमा उजळवण्याच्या नादात त्यांना – अचानक आंदोलनाचा आठव होतो. त्यांची आठ-दहा हजार – होर्डिंग लागल्याने शहराचे – विद्रुपीकरण झाले आहे. अचानक अवतरलेली ही मंडळी गेली तीन-साडेतीन वर्षे कुठे होती ?

प्रसंग-१ : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने यंदा शहरात सर्वाधिक एकवीस ठिकाणी संचलन करून नागरिकांचे लक्ष वेधले. नऊ हजारांहून अधिक स्वयंसेवक त्यात सहभागी झाल्याने पदाधिकाऱ्यांचा उत्साह दुणावणे साहजिकच. तसे संघाचे संचलन शहरवासीयांसाठी नवी बाब नाही; परंतु काही महिने वा दिवसांपर्यंत इतर राजकीय पक्षांत असलेली बरीच मंडळी संघाच्या गणवेशात व थेट संचलनात दिसल्याने नागरिकांत तो कुतूहल व चर्चेचा विषय न ठरावा तरच नवल! पंचवटीत एका माजी महापौराला खाकी पँट व पांढऱ्या शर्टवर पाहून अनेक जण अवाक् झाले. हे महाशय अगदी काही दिवसांपर्यंत वेगळ्या राजकीय विचारांची झूल पांघरून होते. त्यामुळे त्यांचे हे नवे रूप हास्यविनोदाचा विषय ठरले. असो. सिडकोतसुद्धा खंडणी आणि खुनाचा आरोप असलेला एक तरुण पदाधिकारी चक्क संचलनात सहभागी झाल्याचे पाहून येणाऱ्या-जाणाऱ्यांनी आश्चर्याने तोंडात बोटे घातली. 'एवढंच पाहायचं बाकी होतं' अशा प्रतिक्रियाही उमटल्या. नव्या कार्यकर्त्यांच्या या वावराने मूळचे संघवादी आणि निष्ठावंत पदाधिकारी मात्र झाकोळले गेले.

प्रसंग-२: शहरात राजकीय पक्षांचे अनेक नेते व कार्यकर्त्यांनी नवरात्रीचे निमित्त साधून गरबा-दांडिया आयोजित केला. गरब्याच्या एका कार्यक्रमात चौघा इच्छुकांनी एकत्रित येत चक्क संभाव्य पॅनलचे दर्शन घडविले. ही मंडळी त्यांचे कुटुंबीय आणि निवडक समर्थकांसह स्टेजच्या बाजूलाच दहाही दिवस फलक हातात धरून स्वत:च्या पॅनलचे 'प्रमोशन' करीत होती. फलकांवर चौघांची छायाचित्रे व शुभेच्छा संदेश लिहिलेले होते. त्यात स्वत:चा उल्लेख 'समाजसेवक' असा केला होता.

प्रसंग-३: मागील काही दिवसांत उपनगरांमध्ये नागरी प्रश्नांचा आठव येऊन आंदोलनांचे पीकच आल्याचे दिसते. सातपूर, चुंचाळे आणि पंचवटीतही कालपरवा अशीच अचानक आंदोलने झाली. एका बाहुबली नेत्याने पाचपंचवीस महिलांना एकत्र आणून विस्कळीत पाणीपुरवठ्यावरून महापालिकेला जाब विचारला. त्याच्यासोबत आलेल्या महिलांपैकी अनेकींना आपल्याला पालिकेच्या कार्यालयात नेमके कशासाठी आणले, हेच ठाऊक नव्हते. दुसऱ्या एका आंदोलनात माध्यमांचे प्रतिनिधी छायाचित्र घेत असताना, एक भावी नेता अचानक सर्वांच्या पुढे येऊन बसला.

राजकीय पक्षांचे पदाधिकारी, नेते आणि हौसेगवशे इच्छुकसुद्धा तीनसाडेतीन वर्षांच्या अवकाशानंतर सक्रिय झाल्याचे उपरोल्लेखित प्रसंगांतून दिसते. जमेल तशी आणि वाट्टेल तिथे ही मंडळी घुसखोरी करताना दिसते. जानेवारीपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याचे स्पष्ट झाल्याने लोकांची नव्हे, तर स्वत:च्या भवितव्याची चिंता या मंडळींना सतावते आहे. त्यामुळे पक्षनिष्ठा व आचारविचार खुंटीला टांगून ते कामाला लागले आहेत. यांची इतकी पक्षांतरे झाली आहेत, की कोण कुठल्या पक्षात आहे हे कळायला मार्ग नाही. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही किंवा जिकडे सत्ता, तिकडेच नेते व कार्यकर्ते, हे एव्हाना समीकरणच बनल्याने रात्रीतून निष्ठा बदलणारे आणि त्यांना पावन करून घेणाऱ्या राजकीय पक्षांनाही काहीच वाटेनासे झाले आहे. आज संघाच्या संचलनात खाकी चड्डीत दिसणारी ही मंडळी उद्या पुन्हा नव्या मांडवात जाणार नाहीत, याची खात्री कोणीही देऊ शकत नाही, इतके विचार-तत्त्वांचे अध:पतन झाले आहे. राज्यात गेल्या तीन वर्षांत झालेल्या राजकीय उलथापालथी गावागावांपर्यंत पाझरल्याने त्याचे दुष्परिणाम जाणवू लागले आहेत.

शहरात बंडलबाज समाजसेवकांचे पीक वाढल्याचे दुसऱ्या प्रसंगातून स्पष्ट होते. या चमकोबहाद्दरांनी स्वत:च्या प्रमोशनसाठी बॅनरबाजीचा अगदी सोपा व स्वस्त पर्याय निवडला. कोणत्याही परवानगीशिवाय रस्ते, चौक, मोकळ्या जागांवर वाट्टेल तिथे आणि वाट्टेल त्या आकारातली होर्डिंग लावली गेली आहेत. भाऊ, दादा, अण्णा, ताई, आप्पा गल्लोगल्ली चमकत आहेत. आपल्या गॉडफादरसह स्वत:चे कुटुंबीय वा जवळच्या मंडळींसह ते चौकाचौकात अवतरले आहेत. मिसरूडही न फुटलेले अल्पवयीन आणि पोलिसदप्तरी रेकॉर्डवरचे गुन्हेगारही फ्लेक्सवर सर्रास दिसून येतात. अवैध होर्डिंग्ज लावताना रस्ते, चौक अक्षरश: झाकोळण्यात आले. सुरक्षेचे निकषसुद्धा पायदळी तुडविले गेले. पंचवटीत विनापरवानगी लावलेली अशीच एक स्वागतकमान कोसळून तीन जण अगदी थोडक्यात बचावले. पुणे, मुंबईतील होर्डिंग दुर्घटनेची उदाहरणेही ताजीच आहेत. अनेक निष्पापांचा त्यात बळी जाऊनही महापालिका किंवा पोलिस यंत्रणा धडा घ्यायला तयार नाही हे आणखी एक दुर्दैव. शहरात होर्डिंग लावण्याच्या अधिकृत जागा सुमारे अकराशे आहेत. प्रत्यक्षात आठ-दहा हजार अवैध होर्डिंग, फ्लेक्स लागून विद्रुपीकरण तर झालेच; शिवाय, शहर व नागरिकांचा श्वास कोंडल्यागत परिस्थिती निर्माण झाली.

दुसऱ्या बाजूला ध्वनिक्षेपकाच्या कर्णकर्कश आवाजाने प्रदूषणाची पातळी वाढते आहे, याचेही कोणाला भान नाही. अर्थात, उत्सवप्रिय राज्य सरकारने सूटच दिल्याने नवरात्रीतसुद्धा ढोलसोबत कार्यकर्त्यांचाही आवाज वाढला. इच्छुकांच्या भाऊगर्दीमुळे यंदा रावणदहनाचे कार्यक्रमसुद्धा कधी नव्हे ते इतक्या भव्यदिव्य स्वरूपात पार पडले. पुढे दिवाळी असल्याने पणत्या, कॅलेंडर वा इतर छोट्या-मोठ्या भेटवस्तू घेऊन येणाऱ्यांचीही कमी नसेल.

# धोत्रे खुर्द गावातील दोनशे महिलांना मोफत देवदर्शन

**पारनेर (दै. आरंभ पर्व)**

धोत्रे खुर्द येथील यश भैय्या रहाणे मित्रमंडळाच्या वतीने दोनशे महिलांना मोफत देवदर्शन यात्रेचे नुकतेच आयोजन केले होते. नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून एक दिवस हक्काचा माझ्या माता भगिनींचा हा उपक्रम यावर्षी राबविण्यात आलेला आहे

धोत्रे खुर्द - रांजणगाव गणपती - कवठे यमाई माता - निघोज मळगंगा माता येथे २ बसेस व १० चार चाकी गाड्यातून या महिलांना हे देवदर्शन घडविले गेले. या उपक्रमाचे यंदाचे प्रथमच वर्षे आहे.

ज्येष्ठ नेते संभाजीराव रोहोकले शिवबा संघटनेचे अध्यक्ष अनिल शेटे, यांच्या मार्गदर्शनाखाली यश भैय्या रहाणे यांच्या सहकार्याने हा उपक्रम सुरू आहे. रांजणगाव गणपती येथे श्रींचे दर्शन घेतल्यानंतर रांजणगाव गणपती ट्रस्टच्या वतीने आयोजकांचा सन्मान करण्यात आला. विविध क्षेत्रात सामाजिक कार्य केलेल्या महिलांचे या वेळी सत्कार केले गेले. रांजणगाव गणपती, कवठे यमाई माता, निघोज येथील मळगंगा माता दर्शनानंतर धोत्रे खुर्द गावी सर्व महिला आल्या. अनावश्यक खर्च टाळून गावातील भाविक महिलांना देव दर्शन घडवले जाते यावर्षी प्रथमच हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

या कार्यक्रम प्रसंगी माजी सरपंच बाबासाहेब सासवडे राहुल तांबे, जालिंदर भांड, नागेश नरसाळे, दीपक भागवत, सुभाष सासवडे, सुभाष मंचरे, संदीप मंचरे, विशाल भांड, कुंदन सासवडे, संकेत नाईकवाडी, आकाश सासवडे, वैभव लबडे, बाबासाहेब राहींज, ज्ञानदेव संजय राहींज, सचिन राहींज, नितीन राहींज, राहुल राहींज, मयूर धांबोरे, श्रीकांत धांबोरे, चंदू तागड, सुमित नाईकवाडी, कार्तिक सासवडे, सचिन नाईकवाडी, महेश नाईकवाडी,ओम नाईकवाडी, विकास सासवडे, विशाल भांड, निशांत धांबोरे, संतोष धांबोरे आदींसह माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## एक दिवस हक्काचा माझ्या माता भगिनींचा उपक्रम

**नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने गावातील महिलांसाठी मोफत देवदर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले. एक दिवस हक्काचा माझ्या माता भगिनींचा हा उपक्रम यावर्षी मित्र परिवाराच्या वतीने राबवण्यात आला. यात्रेमध्ये महिला भगिनींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. दरवर्षी असे सामाजिक उपक्रम राबवण्याचा आमचा मानस आहे.**

**- यश भैय्या रहाणे**




# आता गोव्यातही गंभीर आजारांवर आयुर्वेदिक उपचारांची मात्रा

- **उपचार व संशोधनासाठी रसायू कॅन्सर क्लिनिक-गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय यांच्यात सामंजस्य करार**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्याची चिकित्सक दृष्टी व गोव्याची औषधी परंपरा आता एका सूत्रात गुंफली जाणार असून, कर्करोग व अन्य गंभीर आजारांवर गोव्यातही आता अत्याधुनिक आयुर्वेदिक उपचारांची मात्रा उपलब्ध होणार आहे. नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय आयुर्वेद दिनानिमित्त कर्करोग व अन्य गंभीर आजारांवरील उपचार व संशोधनासाठी पुण्यातील रसायु कॅन्सर क्लिनिक आणि गोव्यातील गोमंतक आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र, तसेच शिरोडा (गोवा) येथील कामाक्षी आरोग्यधाम यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला आहे.

# ग्रासलँड सोसायटी, कोल्हेवाडी येथे पारंपरिक भोंडला

## खडकवासला भाजप सरचिटणीस धनश्रीताई कोल्हे यांनी केले आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील भाजप सरचिटणीस सौ. धनश्रीताई कोल्हे यांच्या संयोजनातून ग्रासलँड सोसायटी, कोल्हेवाडी येथे पारंपरिक भोंडला कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

महिलांनी पारंपरिक पेहरावात नृत्य, गाणी आणि विविध खेळांमधून सणाचा आनंद घेतला. समाजातील एकोपा आणि संस्कृती जपण्याचा सुंदर संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

या भोंडला उत्सवात पुष्पा कोळेकर, जया तायडे, अंजली जाधव, अनन्या जोशी, पल्लवी तायडे, युगा ठाकरे, प्राजक्ता बाबर, सारिका दारवडकर आदी महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

सौ. धनश्रीताई कोल्हे यांनी उपस्थित महिलांना प्रोत्साहन देत सांगितले की - "भोंडला हा आपल्या संस्कृतीचा आत्मा आहे. अशा सणांमुळे महिलांमध्ये ऐक्य, आनंद आणि सामाजिक बांधिलकी वाढते." भविष्यातही असे विविध उपक्रम राबवणार असल्याचे त्यांनी सांगितले.



## थोडक्यात पण महत्वाचे



### महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांची महती पाषाणमध्ये उलगडली!


- **दिग्दर्शक ओम भावल यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी सादरीकरण**

**पुणे (आरंभ पर्व) : शक्ती, भक्ती, संस्कृती आणि श्रद्धेचा संगम असलेल्या महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांची (तुळजापूर, कोल्हापूर, माहूर आणि वणी) महती सोमवार, दिनांक २९/०९/२०२५ रोजी जय भवानी नगर, पाषाण येथे आयोजित एका विशेष कार्यक्रमात यशस्वीपणे उलगडली. दिग्दर्शक ओम भावल यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली हे प्रभावी सादरीकरण झाले. जय भवानी नवरात्र उत्सव ट्रस्ट, पाषाण आणि चि. कै. प्रतीक निमूण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी ०७:०० वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. महाराष्ट्राची संस्कृती या साडेतीन शक्तिपीठांच्या आराधनेतून कशी समृद्ध झाली आहे, याचे अत्यंत प्रभावी सादरीकरण ओम भावल यांच्या दिग्दर्शनामुळे उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरले. या कार्यक्रमातून महाराष्ट्राच्या समृद्ध आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे विहंगम दर्शन घडले. हा कार्यक्रम पाषाण परिसरातील नागरिकांसाठी एक अध्यात्मिक पर्वणी ठरला आणि आयोजकांनी ओम भावल यांचे तसेच उपस्थित सर्व भाविकांचे आभार मानले.**

### तणावमुक्त जीवनासाठी जनजागृती, प्रोत्साहन गरजेचे : अभय शास्त्री

**पुणे (आरंभ पर्व) : लायन्स क्लबच्या पुढाकाराने लायन्स क्लब ऑफ पुणे सुप्रीम, ईको-फ्रेंड्स, कोथरूड तसेच विविध स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने मानसिक आरोग्यासाठी जनजागृती फेरीचे आयोजन केले होते. सम्यक मेंटल हेल्थकेअरच्या सहकार्याने बाणेर रोड परिसरात ही फेरी निघाली. यासाठी डॉ. रुपाली करवा आणि डॉ. ज्ञानराज चौधरी यांनी मार्गदर्शन केले. येथील नागरिकांशी संवाद साधत फलकांच्या माध्यमातून मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचे आवाहन करण्यात आले. लायन्स क्लबचे माजी प्रांतपाल अभय शास्त्री, संयोजक लायन्स क्लब इको फ्रेंड्सचे अध्यक्ष अनिल मंद्रुपकर, लायन्स क्लब झोन-५ चेअरपर्सन रामेश्वर मणियार, प्रकल्प सह-अध्यक्ष आकाश अंबादे, संजना झंवर, डॉ. अस्मिता सुराणा, रजनी अंबादे, आशा मणियार, सुशील मुंदडा, सुनीता कुलकर्णी, राणी अहलुवालिया, सीमा सिंग आदी उपस्थित होते. अभय शास्त्री म्हणाले, "मानसिक आजारांनी ग्रस्त, तणावाखाली असलेल्या लोकांसाठी सहकार्य करण्याच्या, तसेच जनजागृती करण्याच्या उद्देशाने हाती घेतलेला हा नऊ दिवसांचा कार्यक्रम स्तुत्य आहे. हा आजार नसून, मानसिक स्थिती आहे. त्यातून आपण बरे होऊन चांगले काम करू शकतो, हा विश्वास देण्याचा आमचा प्रयत्न आहे."**


### अष्टभुजा देवी मंदिरात 'अविष्कार'तर्फे नवदुर्गेचा सांगीतिक जागर




**पुणे (आरंभ पर्व) : शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडा, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी, सिद्धिदात्री या देवीस्तुतीतील नऊ देवींच्या रुपांचे साजेसे वर्णन करत नवदुर्गेचा सांगीतिक जागर रसिकांनी अनुभवला. रागदारी, दोन वेगवेगळ्या शैलीतून चितारलेल्या देवींच्या बालरूपातील आणि तरुणरूपातील मनमोहक चित्रांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. निमित्त होते, भाग्यश्री गोडबोले यांच्या देवींवरील स्वरचित बंदिशींच्या 'नवदुर्गा' सादरीकरणाचे! नवरात्रीनिमित्त अविष्कार क्रिएशन्सतर्फे शनिवार पेठेतील गांधर्व महाविद्यालय, तसेच अष्टभुजा देवी मंदिरात कलाकारांनी शास्त्रीय संगीतातील विविध रागांमधे बंदिशी सादर करीत नवदुर्गेचा जागर केला. कर्णमधुर व भावपूर्ण रागदारीने नटलेल्या या बंदिशी ऐकून श्रोते मंत्रमुग्ध झाले. भाग्यश्री गोडबोले, प्रज्ञा देशपांडे, तेजश्री पिटके यांनी बंदिशींचे सादरीकरण केले. ज्येष्ठ संवादिनीवादक प्रमोद मराठे, तसेच त्यांची शिष्या दीप्ती कुलकर्णी यांनी संवादिनीवर, अमित जोशी यांनी तबल्यावर साथसंगत केली. अपर्णा जोशी यांनी निवेदन केले. प्रत्येक देवीचे रुप, स्वभाव लक्षात घेऊन भाग्यश्री यांनी हंसध्वनी, सरस्वती, यमन, कलावती, गौरी, हिंडोल, परमेश्वरी, नारायणी, भीमपलास या रागांत विविध तालांत बांधलेल्या बंदिशींनी रसिकांना मोहिनी घातली. माजी नगरसेविका गायत्री खडके यांनीही या कार्यक्रमाला उपस्थिती लावली.**

## रुपेश घुले पाटील

# कामाच्या जोरावर जनतेतून मागणी म्हणूनच प्रभाग ३३ मधून प्रयत्न



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नांदेड, नांदेड सिटी परिसराच्या, जेपीनगर भागात विकासकामांमुळे गेली अनेक वर्ष जनता माझ्याकडे विश्वासाने पाहते. "मी महानगरपालिकेसाठी इच्छुक आहे, जनतेच्या कामावर आधारितच मला मिळालेला पाठिंबा हा माझा सर्वात मोठा आधार आहे," असे भाजप धायरी-शिवणे मंडलाध्यक्ष रुपेश तात्या घुले पाटील यांनी दैनिक आरंभपर्वच्या मिशन महानगरपालिका 2025 या सदरातील संवादात स्पष्ट केले.

आमदार भीमराव तापकीर यांच्या नेतृत्वाखाली नांदेड व नांदेड सिटी परिसरात कोट्यवधी रुपयांची विकासकामे केली आहेत. ड्रेनेज व्यवस्था, रस्त्यांचे काँक्रिटीकरण, स्वच्छ पाणीपुरवठा, शाळा व सामाजिक सुविधा या क्षेत्रांत त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे, मतदार नोंदणी शिबिरे, लाडकी बहीण योजनेचे फॉर्म भरणे, तसेच कोरोना काळात मदतीचे वितरण अशा अनेक उपक्रमांतून समाजाशी नाळ जोडली आहे.

"मी भारतीय जनता पार्टीचा आणि आमदार भीमराव अण्णा तापकीर यांचा कार्यकर्ता आहे. कार्यकर्ता म्हणून संघटन वाढवणे, जनतेपर्यंत पोहोचणे आणि माणसे जोडणे हेच माझे कर्तव्य आहे. पक्ष देईल ती जबाबदारी स्वीकारत काम करत राहीन," असे ते म्हणाले. लोकसभा, विधानसभा किंवा महानगरपालिका निवडणूक असो, प्रत्येक वेळी त्यांनी कार्यकर्त्याच्या भूमिकेतून भाजपच्या विजयासाठी अहोरात्र प्रयत्न केले आहेत. असेही रुपेश घुले पाटील यांनी स्पष्ट केले.

**राजकीय वारसा आणि प्रस्थ :** घुले पाटील कुटुंबाचा नांदेड गावाशी ऐतिहासिक संबंध आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात त्यांच्या घराण्याला पाटीलकीचा मान मिळाला होता. पणजोबा एकनाथ घुले पाटील हे मुलखी पाटील म्हणून कार्यरत होते, आजोबा मार्तंड घुले पाटील सरपंच व पोलीस पाटील होते, तर वडील आबासाहेब घुले पाटील यांनी सलग 15 वर्षे उपसरपंच म्हणून गावाचा कारभार पाहिला. या वारशातून रुपेश घुले पाटील यांनी राजकीय व सामाजिक क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.

**पक्षीय जबाबदारी आणि जनसेवेची परंपरा :** भाजप प्रभागाध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी संघटन विस्तारावर भर दिला. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून यावर्षी त्यांची खडकवासला मतदारसंघातील भाजप धायरी-शिवणे मंडलाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

पक्षातील विश्वास आणि जनतेतील पाठिंबा या दोन्हीमुळे त्यांचे स्थान मजबूत झाले आहे. त्यांच्या पत्नी सौ. रश्मी घुले पाटील या भाजप महिला आघाडीच्या अध्यक्षा म्हणून कार्यरत आहेत आणि महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवतात.

ही निवडणूक लढवावी व नगरसेवक व हे त्यांच्या वडिलांची इच्छा होती ती पूर्ण करण्यासाठी रुपेश घुले पाटील आगामी महानगरपालिका निवडणुकीमध्ये प्रबळ दावेदार म्हणून पुढे येत आहेत. "जनतेने माझ्यावर दाखवलेला विश्वास हीच माझी खरी ताकद आहे.

पक्षाने दिलेल्या प्रत्येक संधीचा उपयोग जनतेच्या सेवेसाठी करत राहीन आणि शिवणे खडकवासला प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी माझा प्रयत्न अखंड सुरू राहील, पक्ष जो निर्णय घेईल तो आपणास मान्य आहे" असेही त्यांनी आरंभपर्वशी बोलताना सांगितले.

**• शब्दांकन •**

**लक्ष्मण साबळे, निवासी संपादक 8605284272**

**दैनिक आरंभपर्व — मिशन महानगरपालिका २०२५**

## नगरसेवक पदाकडे वाटचाल

**नांदेड व परिसरातील नागरिकांसाठी एकच कॉल प्रॉब्लेम सॉल्व या दृष्टी रुपेश घुले यांची कार्यपद्धती एक आदर्श ठरते. कायमस्वरूपी जनसेवेत सक्रिय असल्यामुळे त्यांची कायम आहे. गेल्या अनेक दशकांपासून नांदेड व परिसरातील जनतेचा त्यांच्यावर असलेला विश्वास, शांत व मनमिळाऊ स्वभाव, आणि विकासकामांची भक्कम पार्श्वभूमी यामुळे येणाऱ्या पुणे महानगरपालिका निवडणुकीत रुपेश घुले पाटील यांचे स्थान नगरसेवक म्हणून निश्चित असल्याचे मानले जाते.**




दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
सोमवार, दि. ०६ ऑक्टोबर २०२५









# दीक्षारंभ – कथक नृत्याचा सुरेल आरंभ

## प्रेक्षक मंत्रमुग्ध, मा. भूपेंद्र मोरे यांचे प्रेरणादायी शब्द ठरले आकर्षणाचा केंद्रबिंदू





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कलाधाम फाउंडेशन आणि नृत्यभूषण कथक अकॅडमी तर्फे सादर करण्यात आलेला "दीक्षारंभ – कथक नृत्याचा सुरेल आरंभ" हा भव्य नृत्यप्रयोग एस. एम. जोशी सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. भारतीय शास्त्रीय नृत्याच्या सौंदर्याचा आणि संस्कृतीचा संगम सादर करणाऱ्या या कार्यक्रमाने प्रेक्षकांच्या मनावर अविस्मरणीय छाप पाडली.

कार्यक्रमाची सुरुवात शिवस्तुतीने झाली. त्यानंतर विद्यार्थिनींनी गणेशवंदना, रामस्तुती आणि श्रीकृष्ण लीला सादर करून भक्ती, भावना आणि नृत्याचे अप्रतिम दर्शन घडवले. ताल प्रस्तुतीमध्ये तीनताल, झपताल, रूपक, धमार, चौताल अशा विविध तालांतील सादरीकरणांनी लय, ताल आणि भाव यांचा सुंदर मिलाफ साधला. "लल्लाटी भंडार" आणि "मोहोर" या नृत्याविष्कारांनी कार्यक्रमाची रंगत अधिक वाढवली.

या कार्यक्रमात गोकृष्ण नृत्यालयाच्या सौ. श्वेता गुलदगड आणि नृत्यभूषण कथक अकॅडमीच्या सौ. गीतांजली साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली ५० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते मा. श्री भूपेंद्र मोरे आणि त्यांच्या पत्नी सौ. नेहा मोरे उपस्थित होते.

भूपेंद्र मोरे यांनी आपल्या प्रभावी भाषणातून उपस्थित प्रेक्षक आणि विद्यार्थिनींना प्रेरणा दिली. त्यांनी सांगितले की "भारतीय शास्त्रीय नृत्य हे केवळ एक कला रूप नाही, तर आपल्या संस्कृतीचे जतन आणि परंपरेचे संवर्धन करणारे सामर्थ्यशाली माध्यम आहे. या संस्कृतीचे जतन करणे ही प्रत्येक समाजघटकाची जबाबदारी आहे."

त्यांनी कार्यक्रमातील प्रत्येक सादरीकरणातील साधना, शिस्त आणि संस्कारांचे कौतुक करत सर्व विद्यार्थिनींचे मनापासून अभिनंदन केले. प्रेक्षकांनी त्यांच्या भाषणाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

तबल्यावर श्री. प्रज्वल दराडे, संवादिनीवर ज्ञानेश भोयार यांनी सुंदर साथ दिली, तर निवेदन शिल्पा धर्माधिकारी यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व विद्यार्थी, पालक आणि गुरु यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

## फ्लेक्सवरील कारवाई नावापुरतीच; अधिकारी व मांडववाल्यांचे लागेबांधे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहराचे विद्रुपीकरण करणाऱ्या बेकायदा फलकांवरील कारवाईत प्रशासनाकडून दुजाभाव केला जात असल्याचे समोर येत आहे. कारवाईदरम्यान रेक्झीनचे फ्लेक्स काढून लोखंडी आणि लाकडी सांगाडे जागेवरच ठेवले जात आहेत. तसेच ते पुन्हा मांडववाल्यांना दिले जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे मांडववाले व अधिकाऱ्यांचे लागेबांधे याद्वारे उघड होत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने फटकारल्यानंतरही महापालिका प्रशासनाकडून अनधिकृत फ्लेक्सवर कारवाई करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. आता सणाचे दिवस असल्याने शहरात मोठ्या प्रमाणात फ्लेक्सबाजी केली जात आहे.

## पूर्ववैमनस्यातून कोयत्याने वार करून दापोडीत तरुणाचा खून

- **दोन संशयितांना पोलिस कोठडी**

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

पूर्ववैमनस्यातून कोयत्याने वार करून तरुणाचा खून करण्यात आला. दापोडी येथे जय भवानी मित्र मंडळाच्या समोरील रस्त्यावर शुक्रवारी (दि. ३ ऑक्टोबर) रात्री अकराच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी दापोडी पोलिसांनी दोन संशयितांना अटक केली. त्यांना न्यायालयाने गुरुवारपर्यंत (दि. ९ ऑक्टोबर) पोलिस कोठडी सुनावली.

शेखर भालेराव (वय २४) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याचे वडील सुदाम भागू भालेराव (५४, रा. दापोडी) यांनी याप्रकरणी शनिवारी (दि. ४ ऑक्टोबर) दापोडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. गौरव गायकवाड (१९) आणि अजय खरात (२०, दोघेही रा. दापोडी) अशी पोलिस कोठडी सुनावण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत.

दापोडीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक महादेव कोळी यांनी दिलेल्या माहितीनुसार, शेखरचे संशयित गौरव आणि अजय यांच्याशी दोन वर्षांपूर्वी भांडण झाले होते. त्या भांडणाचा राग मनात धरून संशयितांनी शेखरवर कोयत्याने वार करून गंभीर जखमी केले. यात त्याचा मृत्यू झाला. याबाबत माहिती मिळताच दापोडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. ससून रुग्णालयात शवविच्छेदन केले. दरम्यान, शेखरच्या वडिलांनी गौरव गायकवाड आणि अजय खरात यांच्यासह आशुतोष बाबासाहेब जाधव, अजय बाबासाहेब जाधव आणि अभिषेक चव्हाण यांच्यावरही संशय व्यक्त केला आहे. यातील गौरव आणि अजय या संशयितांना पोलिसांनी घटनेच्या काही तासांनंतर अटक करून न्यायालयात हजर केले. वरिष्ठ पोलिस निरीक्षक महादेव कोळी तपास करीत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पुणे लोकमान्य फेस्टिवलच्या वतीने तीस फुटी रावणाच्या प्रतिकृतीचे दहन

पुणे (आरंभ पर्व) : पुणे लोकमान्य फेस्टिवलच्या वतीने दसऱ्याच्या निमित्ताने लोकमान्य नगर जॉगिंग पार्क जवळ येथे यंदा 30 फुटी रावणाची प्रतिकृती बनवण्यात आली होती. ओला दुष्काळ, अत्याचारी, वाढती गुन्हेगारी, बेरोजगारी, दहशतवाद अशा रूपात्मक रावणाच्या प्रतिकृतीचे दहन करण्यात येणार आहे. पुणे शहरातून आणि परिसरातून मोठ्या प्रमाणात नागरिकांनी रावण दहन पाहण्यासाठी गर्दी केली होती. यावेळी उपस्थितांनी जय श्रीराम, जय जय श्रीराम अशा घोषणा देवून परिसर दणाणून सोडला होता. यावेळी हवेत रंगीबेरंगी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली होती. अशी माहिती पुणे लोकमान्य फेस्टिव्हलचे संस्थापक अध्यक्ष ॲड. गणेश सातपुते यांनी दिली. उत्सव प्रमुख डॉ. नरेश मित्तल, निमंत्रक शुभांगी सातपुते होते.



### रेल्वे डब्यात साई भजन मंडळाने मोठ्या उत्साहात दसरा सण साजरा

पुणे (आरंभ पर्व) : विजयादशमीच्या निमित्ताने दरवर्षी आपापल्या रेल्वेच्या डब्यात विजयदशमी हा सण जोरदार पद्धतीने साजरा केला जातो. यंदाही साई भजन मंडळ (डोबिवली - दिवा) यांनी अतिउत्साहीत आणि जल्लोषात साजरा केला. यावेळी वारकरी परंपरा जपत या मंडळाचे अध्यक्ष श्री. अंकुश बोरगे बुआ यांनी एक देश, एक गणवेष असे दाखवून दिले. उपाध्यक्ष श्री. प्रवीण मेढेकर बुआ यांनी आपल्या मध्य, पश्चिम, हार्बर या तिन्ही मार्गाचे सर्व भजन मंडळ कमिटीचे अध्यक्ष श्री. हनुमंत तावडे महाराज यांचा शाल व श्रीफळ देऊन मानाने सत्कार केला, यांचवेळी साप्ताहिक प्रकट महाराष्ट्र युट्युब चॅनेल आणि डिजिटल मीडियाचे डोंबिवली प्रतिनिधी श्री. दिनेश हुमणे यांचा सत्कार अध्यक्ष अंकुश बोरगे यांच्या हस्ते करण्यात आला. यांचबरोबर डोंबिवली स्थानकचे रेल्वे मास्तर, रेल्वे पोलीस अधिकारी, आणि मोटरमन यांचाही सत्कार करण्यात आला. भजन मंडळाचे उपाध्यक्ष श्री. प्रवीण मेढेकर यांनी भजनाच्या तालावर सर्वांना मंत्रमुग्ध करून भजन परिसर दुमदुमून टाकले. प्रत्येकाचे पाय या गाडीकडे आकर्षण करीत होते.

## 'स्वच्छता ही सेवा' अभियानात सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय आघाडीवर

### केंद्रीय मंत्री मोहोळ यांच्या हस्ते गौरव



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

"स्वच्छता म्हणजे केवळ जबाबदारी नव्हे, तर ती एक सवय बनली पाहिजे," असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले. महात्मा गांधी जयंतीनिमित्त साजऱ्या करण्यात आलेल्या 'स्वच्छता ही सेवा' पंधरवड्याच्या समारोप कार्यक्रमात त्यांनी सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव केला.

१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या काळात राबविण्यात आलेल्या या उपक्रमात स्वच्छता रॅली, पथनाट्य, जनजागृती शिबिरे, सूक्ष्म स्वच्छता मोहिमा अशा विविध उपक्रमांद्वारे नागरिकांमध्ये पर्यावरण आणि स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली.

या उपक्रमात सक्रिय सहभाग आणि उल्लेखनीय कामगिरीबद्दल महापालिका सहाय्यक आयुक्त प्रज्ञा पोतदार, वरिष्ठ आरोग्य निरीक्षक आशिष सुपणार, उपअभियंता विजय वाघमोडे, अतिक्रमण निरीक्षक मेघा राऊत, आरोग्य निरीक्षक शुभम डोळस, रूपेश मते, राकेश जोरी, दत्तात्रय सुतार, प्रियांका कंक, प्रज्ञा ढमढेरे, मोहिनी चालुक्य, प्रियांका महाले यांसह अनेक कर्मचाऱ्यांना केंद्रीय मंत्री मोहोळ यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

सहाय्यक आयुक्त प्रज्ञा पोतदार म्हणाल्या, "स्वच्छतेकडे नागरिकांचा सहभाग वाढत आहे, हे आमचं यश आहे. अशा अभियानांतून 'स्वच्छ पुणे'चं स्वप्न साकार होईल."

या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., उपआयुक्त संदीप कदम, सहाय्यक आयुक्त तिमया जगले आदी मान्यवर उपस्थित होते.




## 'साहित्य चपराक' दिवाळी अंकाचे दिमाखदार सोहळ्यात प्रकाशन

### जगभरातील वाचकांपर्यंत पोहचलेला दिवाळी अंक



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

दिवाळी अंकांची परंपरा शंभर वर्षापेक्षा जास्त जुनी असून युद्ध असो की दुष्काळ असो किंवा अन्य कोणत्याही प्रकारची सामाजिक संकटे असो तरीदेखील एकदाही खंड न पडता दिवाळी अंकाचा हा मराठी उपक्रम चालू असून त्याचा आपल्याला अभिमान असला पाहिजे. अन्य कोणत्याही भाषेमध्ये दिवाळी अंक प्रकाशित होत नाहीत, हे एक विशेष आहे. दिवाळीच्या आधी साहित्य चपराक आणि लाडोबा हे दोन दिवाळी अंक प्रकाशित केल्याबद्दल आणि विविध देशात पोचविल्याबद्दल चपराचे संपादक घनश्याम पाटील यांचे कौतुक करतो, असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे यांनी व्यक्त केले.

श्रमिक पत्रकार भवनाच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या प्रमुख डॉ. वर्षा तोडमल, निवेदक सुधीर गाडगीळ, पत्रकार सु. ल. खुटवड, 'कालनिर्णय'चे संचालक जयेंद्र साळगावकर, प्रकाशक घनश्याम पाटील, कथाकार चंद्रलेखा बेलसरे व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. वर्षा तोडमल म्हणाल्या, इयत्ता आठवीमध्ये असल्यापासून घनश्याम पाटील हे लिखाण करत असून गरवारे महाविद्यालयाचे ते माजी विद्यार्थी असल्याने आम्हाला त्यांचा अभिमान आहे. आज दिवाळी अंकाच्या एक लाख दहा हजार प्रती छापून त्या विविध देशातील वाचकांपर्यंत पोहोचविल्याबद्दल खरंच त्यांचं कौतुक केले पाहिजे. हे दोन्ही अंक वाचताना असे जाणवले की संपादन ही निर्मिती आहे आणि ही निर्मिती दमछाक करणारी आहे. तरीही हा आनंदाचा उत्सव आहे. भावी पिढीसाठी काम करणारी मासिके खूप कमी निघत आहेत पण लाडोबा वाचून मुलांना आनंदच होत आहे. हा अंक मुलांपर्यंत पोच केला पाहिजे, कारण मुलांची मनाची पाटी जशी कोरी असते. त्याच्यावर जशी पेन्सिल फिरवाल त्याप्रमाणे मुलं ते घेणार असतात. आजची पिढी खूप हुशार असून पालक कुठे ना कुठे कमी पडत असतात. पालक होण्यासाठी कुठली परीक्षा नाहीये, कुठली मुलाखत द्यावी लागत नाहीये. येणाऱ्या पिढीसाठी आपण समृद्ध पालक आहोत की नाही याचा विचार केला पाहिजे. त्यादृष्टीने चांगलं साहित्य मुलांपर्यंत पोचवण्यासाठी पालकांप्रमाणे शिक्षकांनी पण प्रयत्न केले पाहिजे. कारण शिक्षक हा शैक्षणिक क्रांतीचा अग्रदूत असतो असे सांगून या दोन्ही अंकाच्या अनुक्रमणिका अतिशय समृद्ध असल्याचे डॉ. वर्षा तोडमल यांनी सांगितले.

यावेळी संपादक घनश्याम पाटील यांनी साहित्य चपराकची माहिती देताना सांगितले की दिवाळी अंकाची परंपरा मोठी आहे. अनेक चांगले दिवाळी अंक प्रकाशित होत आहेत आणि मराठीचे ते वैभव आहे. २००२ पासून आम्ही 'चपराक'चा दिवाळी अंक जगभरातल्या वाचकांसाठी उपलब्ध करून दिला आहे. दिवाळी अंक आला की दिवाळी सुरू झाली असे अनेक जण सांगतात. यंदा चपराक आणि लाडोबा हे दिवाळी अंक घटस्थापनेला आल्याचा खूपच आनंद वाटतो. दिवाळी अंक भारताबरोबर अमेरिका , ऑस्ट्रेलियासह अनेक देशात पोहोचला असून बेंगलोर येथे चपराकच्या साडेसहा हजार प्रती पाठविल्या आहेत.

या अंकामध्ये आम्ही काही लेख अगदी वेगळे आणि आग्रहाने लिहून घेतलेले आहेत. त्यामुळे आम्हाला जगभरातून वाचकांचे फोन येत आहेत. प्रसिद्ध मुलाखतकार सुधीर गाडगीळ यांचा एक लेख जगभरातून ६८ लाख लोकांनी वाचला आहे. संपूर्ण अंकाचा इंग्रजी अनुवाद केला आहे आणि त्यासाठी ज्योती घनश्याम पाटील यांनी खूपच मेहनत घेतली असल्याचे घनश्याम पाटील यांनी सांगितले. आम्ही वर्षाला १००-१२५ पेक्षा जास्त पुस्तके प्रकाशित करीत आहोत.

दरवर्षी वाचकांना चपराकसारखा एक दर्जेदार दिवाळी अंक दिल्याने मराठी वाचक वाढले असून दिवाळीच्या फराळाबरोबर दिवाळी अंक वाचण्यात एक वेगळीच मजा येते असे संपादक घनश्याम पाटील यांनी सांगितले.

यावेळी सुधीर गाडगीळ, सु. ल. खुटवड यांनी चपराकच्या दिवाळी अंकाविषयी आपले अनुभव सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव गिर यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शुभांगी गिरमे, ज्योती घनश्याम, प्रमोद येवले, अरुण कमळापूरकर, रवींद्र कामठे, दयानंद महापुरे, सचिन सुंबे आदींनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पंतप्रधान यांचा जीवनपट उलगडणाऱ्या छायाचित्र प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे (आरंभ पर्व) : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जीवनपट उलगडणाऱ्या छायाचित्र प्रदर्शनाला दिल्लीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विवेकानंद युथ कनेक्ट फाउंडेशन आणि केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयांतर्गत डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने नवी दिल्ली येथे नुकतेच या पाच दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन केले होते. नरेंद्र मोदी यांच्या बालपणासून ते दूरदर्शी नेता व जागतिक पातळीवरील एक सर्वमान्य नेतृत्व असा जीवनपट या प्रदर्शनातून मांडण्यात आला. प्रदर्शनामध्ये एकूण ६५ छायाचित्रे ठेवण्यात आली होती. या सर्व कलाकृती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे परिवर्तनकारी नेतृत्व, सेवेसाठी अढ़ळ वचनबद्धता आणि भारताच्या प्रगतीतील उल्लेखनीय योगदान अधोरेखित करतात. या प्रदर्शनाचे आयोजन विवेकानंद युथ कनेक्ट फाउंडेशनचे संचालक डॉ. राजेश सर्वज्ञ व फाउंडेशनचे समन्वयक अर्जुन हांगे यांनी केले. प्रदर्शनाला सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश भूषण गवई, केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री गजेंद्रसिंग शेखावत, भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष शाम जाजू, अध्यात्मिक गुरु स्वामी चिदानंद सरस्वती महाराज, डॉ. आचार्य लोकेश मुनीजी, भाजप नेते सुनील देवधर यांच्यासह दिल्लीतील मान्यवर व्यक्ती व नागरिकांनी भेट देऊन मोदींना शुभेच्छा दिल्या.



### लढवय्या धनगर समाजाने 'ओबीसी'चे नेतृत्व करावे : ॲड. प्रकाश आंबेडकर

पुणे (आरंभ पर्व) : धनगर समाज लढवय्या, इतिहासात त्यांची नोंद राज्यकर्ता अशी आहे. समाजाने आपला इतिहास समजून घेत होळकरांनी दिलेली शिकवण अंगीकारत लढवय्यापण दाखवायला हवे. समाजाची सामाजिक व राजकीय ओळख प्रस्थापित करायला हवी. सत्तालोलुप राजकारण्यांनी धनगरांचा, ओबीसींचा वापर करून सत्ता मिळवली आणि तुम्हाला प्रवाहाबाहेर फेकले. आरक्षण हा उन्नतीचा मार्ग असून, तो सुरक्षित ठेवायचा असेल, तर धनगरांनी सर्व ओबीसी समाजाला एकत्रित करून त्यांचे नेतृत्व करावे. आगामी निवडणुकांत ओबीसी, आरक्षणवादी समूहांची सत्ता आपल्याला आणायची आहे. त्यासाठी सर्वांनी एकजूट व्हा," असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले. यापुढे माझे मत ओबीसी, आरक्षणवादी किंवा मुस्लिमांनाच असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. सकल धनगर समाजाच्या दुसऱ्या राज्यस्तरीय अधिवेशनात ॲड. प्रकाश आंबेडकर बोलत होते.







# मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी नागरिकांचा मदतीचा हात

## श्री साई सेवा मंदिर ट्रस्ट व नागरिकांचा सामाजिक उपक्रम – आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते मदतवाहिनीला शुभाशिर्वाद



**वडगाव बुद्रुक (दै. आरंभ पर्व)**

अतिवृष्टी आणि पुराच्या तडाख्याने मराठवाड्यातील अनेक गावांतील शेतकरी, नागरिक, महिला आणि लहान मुले सध्या मोठ्या संकटात सापडले आहेत. शेतातील उभ्या पिकांचे नुकसान, घरांचे पडझड, आणि अन्नधान्याचा तुटवडा अशा परिस्थितीत त्यांना आधार देण्यासाठी वडगाव बुद्रुक येथील श्री साई सेवा मंदिर ट्रस्ट, तसेच गावातील नागरिक पुढे सरसावले आहेत.

ट्रस्टचे अध्यक्ष आणि माजी नगरसेवक हरिदास चरवड यांच्या नेतृत्वाखाली तब्बल साडेतीन टन अन्नधान्य, धान्यधान्य, कपडे, जीवनावश्यक वस्तू आणि शालेय साहित्य संकलित करण्यात आले. या सर्व वस्तू मराठवाड्यातील पूरग्रस्त भागाकडे रवाना करण्यात आल्या. मदतवाहिनी घेऊन जाणाऱ्या टेम्पोचे पूजन खडकवासला मतदारसंघाचे आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी आमदार तापकीर यांनी सांगितले की, "आपत्तीच्या काळात एकमेकांना मदतीचा हात देणे हीच खरी समाजसेवा आहे. वडगाव बुद्रुककरांनी दाखवलेले हे उदाहरण संपूर्ण पुण्याला प्रेरणादायी आहे."

या उपक्रमात एक भावनिक क्षणही पाहायला मिळाला — मराठवाड्यातील शाळकरी विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य खरेदी करण्यासाठी ₹21,000 रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहायता निधीसाठी नगरसेवक हरिदास चरवड यांच्या वतीने आमदार तापकीर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. "ही छोटी मदत असली तरी ती शिक्षणासाठी प्रेरणादायी ठरेल," असे चरवड यांनी सांगितले.

या मदत उपक्रमात भाजपा वडगाव-धायरी मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे, सरचिटणीस शहाजी वांजळे, सामाजिक कार्यकर्ते सुहास पवार, अनंता बनकर, चंद्रकांत पवळे, डॉ. विवेक काळे, जितेंद्र चंपानेरकर, केदार जाधव यांचा विशेष सहभाग होता. तसेच अनंता कांबळे, नंदकिशोर गोसावी आणि वडगाव बुद्रुक परिसरातील अनेक तरुण स्वयंसेवकांनी साहित्य संकलन, वर्गीकरण आणि वाहतुकीची जबाबदारी अत्यंत उत्साहाने पार पाडली. या संपूर्ण मोहिमेत गावकऱ्यांनी एकजुटीने भाग घेतला. अनेक नागरिकांनी धान्य, तांदूळ, गहू, डाळी, बिस्किट पॅकेट्स, साबण, शालेय वह्या, पेन्सिली, कपडे इत्यादी वस्तू मोठ्या प्रमाणात दिल्या. महिलांनीही या उपक्रमात सहभाग घेत घरगुती बनवलेल्या वस्तू दान केल्या.

> ट्रस्टचे अध्यक्ष हरिदास चरवड म्हणाले, "मराठवाडा आपला परिवार आहे. त्यांच्या दुःखात आम्ही सहभागी होणं हीच खरी सेवा आहे. आमदार तापकीर यांच्या प्रोत्साहनामुळे आणि गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे हे कार्य यशस्वी झाले."

## पुणे मार्केट यार्डमध्ये नियमांचे उल्लंघन

**मार्केट यार्ड (दै. आरंभ पर्व)**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीत काही अडत्यांकडून नियमांना फाटा देत रस्त्यातच शेतमालाची विक्री सुरू केली आहे. गाळे रिकामे ठेवून थेट रस्त्यांच्या मधोमध वाहने उभी करून शेतमालाची विक्री चालवली आहे. परिणामी रविवारी मार्केट यार्ड परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. शेतकरी आणि खरेदीदार या दोघांनाही मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागला. मात्र, बाजार समिती प्रशासनाने या प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याचे बोलले जात आहे.

समितीच्या नियमानुसार शेतमाल गाळ्यावर उतरवूनच विक्री करणे आवश्यक आहे. गाळ्यासमोरील १५ फुटांच्या पांढऱ्या पट्ट्यांमध्येच जास्तीच्या आवकेसाठी विक्रीस परवानगी आहे. परंतु काही 'माननीयां'च्या जवळील अडत्यांकडून या नियमांची पायमल्ली होत आहे. गाळ्यांच्या दोन पाकळ्यांमधील रस्त्यावरच वाहने उभी करून माल विक्री सुरू ठेवण्याचा प्रकार आता नियमित झाला आहे. त्यामुळे वाहतूक ठप्प होत असून शेतमाल वेळेत विक्री न होणे, गुणवत्तेत घट येणे आणि व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान अशा समस्या निर्माण झाल्या आहेत.

## बड्या नेत्याच्या मदतीने कुख्यात गुंड घायवळ पळाला परदेशात

- **राष्ट्रवादी काँग्रेस नेत्या सुप्रिया सुळे यांनी घायवळला क्लिअरन्स कोणी दिले याची तपासणी करण्याची मागणी केली.**
- **चंद्रकांत पाटील यांच्या कार्यालयातील समीर पाटील नावाच्या व्यक्तीवर गुन्हेगारी संबंध असल्याचा आरोप झाला आहे.**
- **या प्रकरणामुळे सरकारवर चौकशी व पारदर्शकतेचा दबाव वाढला आहे.**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील कुख्यात गुंड निलेश घायवळ याच्या पलायनाने राजकारण चांगलेच तापले आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मदतीनेच घायवळ परदेशात पळाला असल्याचा आरोप शिवसेना नेते रविंद्र धंगेकर यांनी आरोप केला असतानाच आता माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनीही याचा पुनरुच्चार केला आहे. याबाबत सरकारने चौकशी करावी अशी मागणी देशमुख यांनी केली आहे.

निलेश घायवळला कोणी मदत केली याची चौकशी व्हावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी नुकतीच केली होती.

## पुणे लोकमान्यनगर वासियांचा म्हाडाच्या इमारतीला घेरावा

- **म्हाडाच्या भोंगळ कारभारामुळे पुण्यातील म्हाडाच्या रहिवाशांची अवस्था दयनीय, शेकडो रहिवासी उतरले रस्त्यावर**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

म्हाडाच्या भोंगळ कारभारामुळे पुण्यातील म्हाडाच्या रहिवाशांची अवस्था दयनीय झाली असून म्हाडाच्या अनागोंदी कारभारामुळे "कोणी नवीन घर देत का घर" अशी नागरिकांची अवस्था झाली आहे. पुणे लोकमान्यनगर बचाव कृती समितीच्या वतीने व महाराष्ट्र हाउसिंग बोर्ड पुनर्विकास कृती समिती येरवडा यांच्यावतीने (ता. ३) रोजी पुणे स्टेशन येथील म्हाडाच्या इमारतीला शेकडो नागरिकांनी घेरावा घातला होता. यावेळी नागरिकांनी म्हाडाच्या आणि राज्य शासनाच्या विरोधात जोरदार निदर्शने करण्यात आली. या आंदोलनात महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. "घर आमच्या हक्काच" मुर्दाबाद मुर्दाबाद राज्य शासनाचा मुर्दाबाद, म्हाडाचा धिक्कार असो अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता. याप्रसंगी ॲड. गणेश सातपुते यांनी लोकमान्यनगर बचाव कृती समिती तर अजय बल्लाळ यांनी महाराष्ट्र हाउसिंग बोर्ड येरवडा कृती समिती येथील रहिवाशांची बाजू मांडली.

नागरिकांनी म्हाडाच्या अधिकाऱ्यांना खडे बोल सुनावले. "आम्हाला आमची स्वप्नं साकार करू द्या, आमच्या घरांवर विकासकांवर आणलेले स्थगिती अगोदर उठवा, मगच चर्चा अशी नागरिकांनी ठाम भूमिका घेतली. परिणामी गोंधळातच वादळी चर्चा झाली. आम्हाल आमची स्वप्न पाहू द्या आणि पूर्ण करू द्या, तुम्ही आम्हाला गृहित धरू नका, म्हाडाने आणलेले स्थगिती त्वरित हटवा, आमचा आम्हाला विकास करू द्या, रहिवाशांना विचारात घेऊनच स्वतः रहिवाशांना घरांचे पुनर्विकासाला करू द्या. यावेळी नागरिकांनी पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ म्हाडाचे अध्यक्ष आढळराव पाटील, मुख्य अधिकारी राहुल समोरे यांना भेटून नागरिकांनी निवेदन दिले.

## रेकॉर्डवरील गुन्हेगाराचा साथीदारांकडून डोक्यात दगड घालून खून

**वाघोली (दै. आरंभ पर्व)**

पुण्यात गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असून, आयुष्य कोमकर हत्या प्रकरण आणि कोथरूड गोळीबार प्रकरणाची धग अजूनही ओसरलेली नसतानाच वाघोली परिसरात पुन्हा एकदा खूनाची घटना घडली आहे. अधिकच्या माहितीनुसार, उबाळे नगर परिसरातील कृष्णा लॉजसमोर रविवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास रेकॉर्डवरील गुन्हेगाराचा डोक्यात दगड घालून खून करण्यात आला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, मृताचे नाव बादल शेख (वय २४, रा. खराडी) असे असून, त्याचा त्याच्याच तीन साथीदारांनी खून केला आहे. हे तिघेही रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. शनिवारी रात्री खराडी परिसरात आरोपी आणि बादल शेख यांच्यात वाद झाला होता. त्यानंतर चौघे एका दुचाकीवरून वाघोलीतील कृष्णा लॉज येथे आले. रूम घेण्याबाबत चौकशी करत असताना पुन्हा भांडण उफाळले. या वेळी आरोपींनी बादल शेखवर वार करून त्यानंतर दगड घालून ठार मारले. घटनेची माहिती मिळताच लोणीकंद पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन तो शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

# पर्यटन, चित्रपटसृष्टीच्या समन्वयातून मोठ्या संधी उपलब्ध

## चौथ्या आंतरराष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवात तज्ज्ञांचा सूर; 'मोलाई' लघुपटाला प्रथम क्रमांक

### जागतिक पर्यटन दिनानिमित्त महाराष्ट्र पर्यटन विभाग, परभन्ना फाउंडेशनतर्फे दोन दिवस आयोजन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

चित्रपटांमधून दाखवलेली स्थळे पर्यटकांना आकर्षित करतात. स्थानिक संस्कृती, परंपरा व नैसर्गिक सौंदर्य यांचा जागतिक पातळीवर प्रसार करण्यासाठी चित्रपट हे महत्त्वाचे साधन ठरू शकते. त्यामुळे चित्रपटसृष्टी आणि पर्यटन या दोन क्षेत्रांचा परस्परांशी चांगला समन्वय झाला, तर जागतिक पातळीवर मोठ्या संधी उपलब्ध होतील, असा सूर चौथ्या आंतरराष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवात उमटला. पर्यटन क्षेत्राच्या प्रचारासाठी लघुपट हे प्रभावी माध्यम असल्याचेही वक्त्यांनी नमूद केले.

जागतिक पर्यटन दिनानिमित्त परभन्ना फाउंडेशन, महाराष्ट्र पर्यटन विभाग, महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी व सांस्कृतिक विकास मंडळ आणि धोंडू बाजी चव्हाण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय महोत्सवात तज्ज्ञांनी विविध चर्चासत्रांत विचार मांडले. पानशेत धरण परिसरातील सूर्यशिबिर रिसॉर्टमध्ये या दोन दिवसांच्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. लघुपट, माहितीपटांचे स्क्रीनिंग, पर्यटन व चित्रपटांसंबंधी विषयांवर चर्चासत्रे, जंगल सफारी, सांस्कृतिक सांगीतिक कार्यक्रम झाले.

अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांची शाही मिरवणूक, शिवकालीन शस्त्रांचे प्रात्यक्षिक व ऐतिहासिक मर्दानी खेळांचे सादरीकरण करत महोत्सवाचे उद्घाटन झाले. प्रसंगी आमदार शंकर मांडेकर, अभिनेत्री स्मिता तांबे, पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे, माजी सनदी अधिकारी अर्जुन म्हसे पाटील, संयोजन समिती प्रमुख अजित शांताराम, ज्युरी सदस्य डॉ. संतोष पाठारे आदी उपस्थित होते.

'मोलाई: मॅन बिहाइंड द फॉरेस्ट' या माहितीपटाने, तर 'शरावथी सांगथ्या' लघुपटाने महोत्सवाचे विजेतेपद पटकविले.

माहितीपट विभागात 'गुडवी: मायग्रेटरी बर्ड्स नेस्ट'ने, तर लघुपट विभागात 'मिनी बँक'ने द्वितीय क्रमांक मिळवला. धीरज कश्यप (मोलाई) व याजी (शरावथी सांगथ्या) यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार मिळाला. 'दशावतारी ऑफ कोकण'ला विशेष पारितोषिक देण्यात आले. स्पेशल ज्युरी अवॉर्डने डिव्हाईन कलर्स ऑफ फेथ व झालना या लघुपटांना सन्मानित करण्यात आले.

'पानशेतमधील महोत्सवाचे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिणाम', तसेच 'पानशेतमधील निसर्ग, इतिहास आणि पर्यटनातील रोजगाराच्या संधी' या विषयावर परिसंवाद झाले. स्थानिक पर्यटन, रिसॉर्ट मालक, टूर्स अँड ट्रॅव्हल्स यांच्या मेळाव्यातून विचारांचे व संधींचे आदानप्रदान झाले. 'पानशेतमधील निसर्ग, इतिहास, भूगोल आणि पर्यटनातील उलगडा' यावर श्रमिक गोजमगुंडे आणि महेश धिंडले यांची प्रकट मुलाखत झाली.

'महाराष्ट्रातील पर्यटनस्थळे व चित्रपटाचे चित्रीकरण' या विषयावर झालेल्या चर्चासत्रात कलादिग्दर्शक सुमित पाटील, हॉस्पिटॅलिटी मार्केटिंग तज्ज्ञ अमेय भाटे, गोल्डन ट्रेल्सचे प्रमुख निलेश धामिस्टे, निसर्गशाळाचे संस्थापक हेमंत वाव्हळे, मुळशी टूर्सचे हनुमंत चोंधे यांनी विचार मांडले. यावेळी पुण्यातील टूर्स अँड ट्रॅव्हल्सच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. समारोपावेळी पर्यटन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल गिरीसागर टूर्सच्या संचालिका वीणा गोखले यांना जीवनगौरव, तर गेट सेट गो हॉलिडेजचे संचालक अमित कुलकर्णी यांना सर्वोत्कृष्ट 'टूर्स अँड ट्रॅव्हल्स' पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रसंगी अभिनेता विठ्ठल काळे, अभिनेत्री वैशाली केंदळे, रोटरी क्लब ऑफ पुणे सनराईजचे अध्यक्ष जीवराज चोले, संयोजक गणेश चप्पलवार आदी उपस्थित होते.

गणेश चप्पलवार म्हणाले, "यंदा चौथ्या महोत्सवात आलेल्या ६१ पैकी १७ निवडक लघुपट व माहितीपटांचे स्क्रीनिंग झाले. शालेय जीवनातच पर्यटनाविषयी आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने निबंध स्पर्धेचेही आयोजन केले होते. ३० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला. तसेच १८ पेक्षा अधिक प्रवासवर्णने आली होती."

> "महोत्सवात सादर झालेल्या लघुपटांमुळे विविध पर्यटन स्थळांचे अनोखे पैलू प्रकाशझोतात आले. आंतरराष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवाद्वारे केवळ पर्यटनाचा प्रचारच होत नाही, तर स्थानिक कलाकार व चित्रपट निर्मात्यांनाही नवे व्यासपीठ मिळते. पर्यटनाला समर्पित हा महोत्सव पर्यटन व चित्रपट या दोन्ही क्षेत्रांची सांगड घालणारा आहे."

> आरजे तेजू यांनी सूत्रसंचालन केले. असीम त्रिभुवन यांनी आभार मानले. डॉ. राजीव घोडे, अश्विनी वाघ, महेश गोरे, अजित शांताराम, साहिल भोसले, सारंग मोकाटे यांनी महोत्सवाच्या आयोजनात परिश्रम घेतले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.